संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# कोळसा उगाळला काँग्रेस डागाळली

काँग्रेसच्या सव्वाशे वर्षांच्या आयुष्यात इतकी काळीकुट्ट कारकीर्द कधीही आली नसावी. आता या मनमोहनसिंग सरकारचे जेमतेम ८०-९० दिवस उरले आहेत. त्यांच्यावरदेखील कोळसा खाणीतल्या भ्रष्टाचारावरून काळेपाणी फिरवले जाण्याची शक्यता आहे. कारण २००५ ते २०१० या कालावधीत कोणतीही निविदा न काढता कोळसा खाणीचे मनमानी वाटप केले गेले आणि देशाचे १.८० लाख कोटींचे नुकसान केले गेले.आता तर सरकारचेच कायदेशीर सल्लागार असलेल्या ॲटर्नी जनरलनी सरकारवरच तोफ डागली आहे आणि एकूण ६० खाणींपैकी २६ खाणींचे वाटप बेकायदेशीरपणे झाल्याचे सांगून सरकारलाच मोठा धक्का दिला आहे. यावरून कोळसा खाण वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरकारभार झाला. याची प्रत्यक्ष कबुलीच एका अर्थी सरकारने दिली आहे. सरकारचे ॲटर्नी जनरल जी.ई.वहानवटी यांनी सरकारला सूचना करून २६ कोळसा खाणींचे वाटप रद्द करण्यास सांगितले आहे. अशी वेळ सरकारच्या कायदेशीर सल्लागारावर यावी ही देशाच्या इतिहासातील पहिलीच घटना घडते. एखाद्या दुसऱ्या कोळसा खाणीचे वाटप बेकायदेशीर असते आणि त्याविरुध्द सरकारला धारेवर धरले गेले असते तरी ते समजू शकले असते. परंतु, तब्बल २६ कोळसा खाणींना कुलूप ठोकायला सांगून वहानवटी यांनी सरकारच्या तोंडालाच कुलूप ठोकले असे म्हणावे लागते. जाता जाता हा कोळसा काँग्रेसची चांगलीच राख करून जाईल असे स्पष्टपणे दिसते. आपण नेहमी असे म्हणतो की कोळसा कितीही उगाळा तरी तो काळा असतोच. मनमोहनसिंग सरकारचे असेच झाले आहे. कोळसा भ्रष्टाचार अधिकाधिक उगाळला जात आहे आणि या सरकारचे तोंड अधिकाधिक काळे होत आहे.

### पक्षालाच पक्षघात

काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी पत्रकार परिषद घेतली. आपण अनेक चांगली कामे केली असे सांगताना आपण किती खरे खोटे आहोत हे या देशाचा इतिहास ठरवेल, असेही विधान त्यांनी केले. ही पत्रकार परिषद म्हणजे त्यांनी पंतप्रधान पदाचा निरोप घेतल्यासारखीच परिस्थिती होती. महागाईला आपण रोखू शकलो नाही आणि भ्रष्टाचारही थांबवू शकलो नाही अशी कबुलीच त्यांनी त्या पत्रकार परिषदेत दिली होती. मग त्यांनी नेमके काय केले असा प्रश्न निर्माण होतो. विशेषत: गेल्या पाच वर्षांत भ्रष्टाचाराचा उच्चांक गाठला गेला. टू-जी स्पेक्ट्रम प्रकरणात असेच एक लाख कोटी वाया गेले. राष्ट्रकूल स्पर्धेचा घोटाळा झाला. त्यात किमान ७० हजार कोटींचा पैसा हडप झाला. कोळसा खाणीच्या घोटाळ्याने तर सगळ्यांनाच मागे टाकले. अगदी अलिकडे रेल्वे मंत्रालयात मोठ्या पदांची वर्णी लावण्याकरिता बाजारातल्या लिलावासारखी बोली लावली गेली, महाव्यवस्थापक पदासाठी २०-२० कोटींची लाच मागितली गेली आणि शेवटी रेल्वे मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. आतापर्यंत जे-जे घोटाळे झाले त्यातल्या प्रत्येक मंत्र्याला घरी जाणे भाग पडले. दोघांना तर थेट जेलची हवा खावी लागली असा सगळा भ्रष्टाचाराचा धुमाकूळ सुरू असताना मनमोहनसिंग मात्र तो शांतपणे पाहत राहिले. आपली प्रतिमा स्वच्छ आहे असे भासवण्याच्या नादात ते मश्गुल होते. पण दुसरीकडे सगळ्या सरकारची प्रतिमा डागाळली जात होती. त्यांना सरकारच्या प्रतिमेपेक्षा स्वत:ची प्रतिमा जास्त महत्त्वाची वाटली. पहिल्या २-४ भ्रष्टाराचाराच्या प्रकरणावरून त्यांनी जर राजीनामा देण्याची तयारी दाखवली असती तर आज काँग्रेसची इतकी वाईट अवस्था झाली नसती. कोळसा उगाळलाच गेला आणि काँग्रेस डागाळलीच गेली. एकट्या मनमोहनसिंगांमुळे काँग्रेसची ही दुर्दशा झाली, असे म्हणण्याची वेळ आली आहे.

### शेवटी तरी जाग यायला हवी होती

जिथे हात लावावा तिथे काँग्रेसचा हात काळा व्हावा अशी आज परिस्थिती आहे. अगदी एखाद्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले तरी त्यातून भ्रष्टाचाराचा नवीनच ज्वालामुखी बाहेर येत गेला. वीस वर्षांपूर्वी आर्थिक सुधारणा घडवून थोडीफार लोकप्रियता कमाविलेल्या मनमोहनसिंगांनी भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करून आपली प्रतिष्ठा गमाविण्याचे काम केले. आता देशाच्या ॲटर्नी जनरलसारख्या सर्वोच्च कायदेशीर पद असलेल्या व्यक्तीने सरकारचे कान उपटले आहेत आणि सरकारची उरलीसुरली पत ही लयाला गेली आहे. साध्या सामान्य माणसाला महागाईच्या वणव्यात लोटून त्यांचा शाप घेण्याचे काम या सरकारने केले. भारतासारख्या गरीब देशात १२०० रुपयाला गॅस सिलिंडर अशी कल्पना कोणी स्वप्नातदेखील केली नव्हती. कोळसा देखील भ्रष्टाचारामुळे महाग झाला आणि सामान्य माणसाला स्वयंपाकासाठीसुध्दा मिळविता आला नाही, अशा एका ना अनेक घोटाळ्यांच्या जाळ्यात अडकलेले हे यूपीए सरकार आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यात मग्न राहिले. 'आम आदमी के साथ काँग्रेस का हात' अशी घोषणा देत 'आम आदमी'ला वाऱ्यावर सोडले गेले. आता या पक्षावर पक्षघात होण्याची वेळ आली आहे. आश्चर्य एवढ्या गोष्टीचे वाटते की निदान शेवटच्या वर्षांत तरी आपली प्रतिमा सावरण्याचा प्रयत्न मनमोहनसिंग यांनी करायला हवा होता, कठोर निर्णय घेऊन सुधारणा करायला हव्या होत्या किंवा काँग्रेसनेसुद्धा वर्षापूर्वीच मनमोहनसिंग यांच्या हातात नारळ देऊन राहुल गांधींच्या हातात सत्ता दिली असती तरी थोडाफार फरक पडू शकला असता. पण आता ती शक्यता ही उरलेली नाही. गैरकारभाराच्या काळ्या कारकिर्दीने काँग्रेसचे हात काळे केले गेले ही या पक्षाची शोकांतिका ठरते. भविष्यामध्ये काँग्रेसला आपली परिस्थिती सुधारायची असेल तर सर्व प्रथम भ्रष्टाचाराबाबत कठोर भूमिका घ्यावी लागेल. त्यांच्या रोमारोमात भिनलेला भ्रष्टाचार एकदम निघणार नाही त्यासाठी वेगळ्या प्रयत्नांची गरज लागेल. आज जनतेला सर्वच राजकीय पक्षांकडून स्वच्छ कारभाराची अपेक्षा निर्माण झाली आहे.